ePaper
वर्ष - 9 | अंक - 02 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

www.mahaenews.com | रविवार, दि. 17 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आम्ही काही सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलोय असं नाही... अजित पवार



### आतील पानांत


- गंभीर दुखापतीस खेळाडू बदलाची मान्यता
- सोनालीचा मराठमोळा अंदाज!
- पालिकेतील पापाची हंडी आम्ही फोडली
- कोण देणार या प्रश्नांची उत्तरे?


**राज-का-रण** ठाकरे बंधुंच्या युतीच्या चर्चांना वेग; मुंबई, ठाणे, नाशिक, संभाजीनगरमध्ये बदलणार समीकरणं

# भाजपाला बसणार मोठा फटका ?

## मनसेच्या निवडणुकीतील चढउतारांवरून दिसून येतो शिवसेनेसाठी संभाव्य फायदा



। मुंबई ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (ठाकरे गट) आणि राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमध्ये लवकरच युती होणार, अशा चर्चांना पुन्हा वेग आला आहे. मुंबई महापालिकेसह आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ठाकरे बंधू एकत्र लढवणार असल्याचे संकेत पक्षांतर्गत बैठकीतून मिळत आहेत. "ठाकरे बंधू महापालिकेच्या निवडणुका एकत्रित लढवतील आणि विजय मिळवतील. त्यांच्या एकीला कोणतीही शक्ती तोडू शकणार नाही," असे संकेत खासदार संजय राऊत यांनी शुक्रवारी दिल्यामुळे या चर्चेला उधाण आले आहे.

**राज ठाकरेंची बदलती भूमिका व भाजपाचा दृष्टिकोन**

राज ठाकरे यांच्या राजकीय भूमिकेमुळे विरोधकांबरोबरच सत्ताधाऱ्यांतही संभ्रम असतो. अलीकडेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महायुतीच्या नेत्यांबरोबर झालेल्या त्यांच्या भेटींमुळे ते भाजपात जाणार का, अशी चर्चा रंगली होती. मुंबईतील मराठी मतदारांचा झुकाव मनसेकडे असल्याने भाजपाही त्यांना महायुतीत सामावून घेईल, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र आता उद्धव ठाकरेंबरोबरची युती अधोरेखित होत असल्याने भाजपाला शहरी भागात मोठा फटका बसू शकतो.

**मनसेचा निवडणुकांमधील आलेख**

२००९ विधानसभा : मनसेनं ५.७% मतांसह १३ जागा जिंकल्या.

२०१४–२०१९ विधानसभा : फक्त १ जागेवर विजय; प्रभाव घटला.

महापालिका २००६–२००९ : १२ महानगरपालिकांमध्ये ४५ जागा, मुंबईत १०.४३% मते, नाशिकमध्ये १२ जागा. महापालिका २००९–२०१४ : मनसेचा शिखरकाळ — नाशिकमध्ये ४० जागा, पुण्यात २९, मुंबईत २८, कल्याण-डोंबिवलीत २७; मतांची टक्केवारी १२.४३% वर. २०१४–२०१९ : मोठी घसरण; २६ जागांवर विजय, मतांची टक्केवारी ३.५६% वर घसरली. या आकडेवारीवरून स्पष्ट होते की, मनसेचा आलेख जरी उतरला असला तरी मराठी मतदारांमध्ये त्यांचा प्रभाव आजही जाणवतो. विशेषतः मुंबई, नाशिक, ठाणे व कल्याण-डोंबिवलीसारख्या शहरी भागात त्यांच्या मर्यादित मतांचाही परिणाम निवडणूक निकालावर होऊ शकतो. मनसेचा स्वतंत्र प्रभाव जरी घटला असला तरी त्यांची मतांची टक्केवारी व मराठी मतदारांतील पकड ही शिवसेनेसाठी निर्णायक ठरू शकते.

## युतीमुळे संभाव्य राजकीय गणित

२००६ ते २०१४ या काळात मनसे व शिवसेनेने एकत्र निवडणूक लढवली असती, तर कल्याण-डोंबिवलीसारख्या ठिकाणी स्पष्ट बहुमत मिळालं असतं.

मुंबईत मनसेला मिळालेल्या १०% मतांमुळे भाजपाची मते मागे पडली होती.

नाशिकमध्ये २८% मतं मिळवत मनसे सर्वात मोठा पक्ष ठरला होता.

त्यामुळे ठाकरे बंधुंची युती आगामी मुंबई, ठाणे, नाशिक, संभाजीनगर महापालिकांमध्ये भाजपाला गंभीर आव्हान उभं करू शकते, असा अंदाज राजकीय विश्लेषक वर्तवत आहेत.

गुन्हे वृत्त

## २ काडतुसे जप्त; औंध रुग्णालय परिसरातून अटक...

# शेख टोळीप्रमुख आणि नंबरकारीला बेड्या

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गुन्हे शाखा युनिट चार ने बाबा शेख गँग चा टोळी प्रमुख आणि नंबरकारी यांना बेड्या ठोकल्या आहेत. त्यांच्याकडून दोन पिस्तुले आणि दोन जिवंत काडतुसे पोलिसांनी जप्त केली आहेत. बाबा सैपन शेख आणि आशिष अनिल कांबळे अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.**

## ४० हजार विद्यार्थ्यांचे नुकसान








पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सराईत गुन्हेगार बाबा सैपन शेख हा कोविड काळात येरवडा कारागृहातून पॅरोलवर बाहेर आहे. परंतु, अद्याप ही कालावधी संपून देखील येरवडा कारागृहात हजर झालेला नाही. याबात येरवडा कारागृहाच्या कळवण्यात आलं आहे. दोन्ही सराईत गुन्हेगारांना गुन्हे शाखा युनिट चार ने औंध रुग्णालय परिसरातून अटक केली आहे. सराईत गुन्हेगार आणि बाबा शेख टोळीचा प्रमुख आहे. त्याचा साथीदार आणि नबंरकारी साथीदार आशिष कांबळे याला देखील पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. दोघांकडून दोन पिस्तुले आणि दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आले आहेत. बाबा शेख याच्यावर विविध १५ गुन्हे दाखल आहेत. आशिष कांबळे यांच्यावर ही दोन गुन्हे दाखल आहेत. ही कारवाई पोलीस उपायुक्त शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अरविंद पवार पोलीस उपनिरीक्षक भरत गोसावी यांच्या पथकाने केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सराईत गुन्हेगार बाबा सैपन शेख हा कोविड काळात येरवडा कारागृहातून पॅरोलवर बाहेर आहे. परंतु, अद्याप ही कालावधी संपून देखील येरवडा कारागृहात हजर झालेला नाही.

याबात येरवडा कारागृहाच्या कळवण्यात आलं आहे. दोन्ही सराईत गुन्हेगारांना गुन्हे शाखा युनिट चार ने औंध रुग्णालय परिसरातून अटक केली आहे. सराईत गुन्हेगार आणि बाबा शेख टोळीचा प्रमुख आहे. त्याचा साथीदार आणि नबंरकारी साथीदार आशिष कांबळे याला देखील पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. दोघांकडून दोन पिस्तुले आणि दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आले आहेत. बाबा शेख याच्यावर विविध १५ गुन्हे दाखल आहेत. आशिष कांबळे यांच्यावर ही दोन गुन्हे दाखल आहेत. ही कारवाई पोलीस उपायुक्त शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अरविंद पवार पोलीस उपनिरीक्षक भरत गोसावी यांच्या पथकाने केली आहे.

## बाबा शेख याच्यावर १५ गुन्हे

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सराईत गुन्हेगार बाबा सैपन शेख हा कोविड काळात येरवडा कारागृहातून पॅरोलवर बाहेर आहे. परंतु, अद्याप ही कालावधी संपून देखील येरवडा कारागृहात हजर झालेला नाही. याबात येरवडा कारागृहाच्या कळवण्यात आलं आहे. दोन्ही सराईत गुन्हेगारांना गुन्हे शाखा युनिट चार ने औंध रुग्णालय परिसरातून अटक केली आहे.

गुन्हे शाखा युनिट चार ने बाबा शेख गँग चा टोळी प्रमुख आणि नंबरकारी यांना बेड्या ठोकल्या आहेत. त्यांच्याकडून दोन पिस्तुले आणि दोन जिवंत काडतुसे पोलिसांनी जप्त केली आहेत. बाबा सैपन शेख आणि आशिष अनिल कांबळे अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सराईत गुन्हेगार बाबा सैपन शेख हा कोविड काळात येरवडा कारागृहातून पॅरोलवर बाहेर आहे. परंतु, अद्याप ही कालावधी संपून देखील येरवडा कारागृहात हजर झालेला नाही. याबात येरवडा कारागृहाच्या कळवण्यात आलं आहे. दोन्ही सराईत गुन्हेगारांना गुन्हे शाखा युनिट चार ने औंध रुग्णालय परिसरातून अटक केली आहे.सराईत गुन्हेगार आणि बाबा शेख टोळीचा प्रमुख आहे. त्याचा साथीदार आणि नबंरकारी साथीदार आशिष कांबळे याला देखील पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

दोघांकडून दोन पिस्तुले आणि दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आले आहेत. बाबा शेख याच्यावर विविध १५ गुन्हे दाखल आहेत. आशिष कांबळे यांच्यावर ही दोन गुन्हे दाखल आहेत. ही कारवाई पोलीस उपायुक्त शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अरविंद पवार पोलीस उपनिरीक्षक भरत गोसावी यांच्या पथकाने केली आहे.

# मला अनेक चांगल्या भूमिका मिळाल्या

## अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते 'कोहिनूर रत्न' पुरस्कार प्रदान

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**'आपल्याकडे सकस साहित्यावर बेतलेले चित्रपट लोकांच्या पसंतीस उतरले आहेत,' असे मत ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांनी शनिवारी व्यक्त केले. त्यामुळे तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी चित्रपटामध्ये कथेला महत्त्व आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. 'चित्रपट क्षेत्रात कृष्णधवल काळापासून आताच्या एआयपर्यंत झालेल्या विविध बदलांची मी साक्षीदार आहे. मी आजही चित्रपट पाहते, होता,' असे मत पारेख यांनी व्यक्त केले.**



पूना गेस्ट हाउस स्नेहमंच, कोहिनूर कट्टा आणि विदिशा विचार मंच यांच्या वतीने रविवारी (१७ ऑगस्ट) कोहिनूर ग्रुपचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते 'कोहिनूर रत्न' पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. त्यानिमित्त आशा पारेख यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्या वेळी त्या बोलत होत्या.'आई फर्ग्युसन महाविद्यालयात शिक्षण घेत असताना माझे वडील तिला भेटायला यायचे. त्यांचे आंतरधर्मीय लग्न ही त्या काळातील एक क्रांतिकारी गोष्ट होती.

## मी पुण्यात घरदेखील घेणार

आशा पारेख यांचा पुण्याशी असलेला विशेष संबंध आणि जिव्हाळा त्यांनी या गप्पांमध्ये उलगडला. त्या म्हणाल्या, 'पुण्याविषयी माझ्या मनात खास जागा असून, मी पुण्यात घरदेखील घेणार होते. पण, ते स्वप्न अपूर्णच राहिले. मला पुरणपोळी फार आवडते. आपल्याकडे सकस साहित्यावर बेतलेले चित्रपट लोकांच्या पसंतीस उतरले आहेत.

मात्र, माझे आजोबा चित्रपटांना अर्थसाह्य करणारे असल्यामुळे चित्रपटात काम करण्याबद्दल मला घरातून विरोध होण्याचा प्रश्न नव्हता. स्वतःहून चित्रपटात काम करण्याची आलेली संधी मी स्वीकारली. गुरुदत्त, राजेश खन्ना, देव आनंद, शम्मी कपूर यांच्याबरोबर काम करता आले, याचा आनंद आहे. मला अनेक चांगल्या भूमिका करता आल्या, पण तरीही मला 'मदर इंडिया'ची भूमिका करायला नक्कीच आवडले असते,' असे पारेख यांनी सांगितले.मला अनेक चांगल्या भूमिका करता आल्या, पण तरीही मला 'मदर इंडिया'ची भूमिका करायला नक्कीच आवडले असते.

## आमदार लांडगे यांची मागणी | पिंपरी-चिंचवडच्या पाणीपुरवठा सक्षमीकरणासाठी

# आता “ॲक्शन प्लॅन”!

### पाणीपुरवठ्याची गरज आणि उपायोजनाबाबत बैठक घ्या; मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मागणी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरात मेट्रोचा दुसरा मार्ग साकारला जाणार आहे. निगडी ते चाकण या ३१ स्टेशन असलेल्या ४०.९२६ किलोमीटर अंतराच्या मार्गासाठी एकूण १० हजार ३८३ कोटी ८९ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. या मार्गामुळे पिंपरी-चिंचवड व चाकण एमआयडीसी तसेच, हिंजवडी आयटी पार्कचा भाग मेट्रोने जोडला जाणार आहे.**




“पिंपरी-चिंचवड शहराची वेगाने वाढणारी लोकसंख्या आणि भविष्यातील पाणी गरजा लक्षात घेता, जलस्रोतांची नियोजनबद्ध वाढ आणि सुरू असलेल्या पाणी प्रकल्पांना गती देणे अत्यंत गरजेचे आहे. नागरिकांना शाश्वत आणि पुरेसा पाणी पुरवठा मिळावा यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करत आहोत. मुख्यमंत्री आणि संबंधित मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली लवकरच आढावा बैठक घेतली जाईल. शहरासाठी आवश्यक निर्णय वेळीच घेतले जातील, यासाठी मी कटिबद्ध आहे.”
**-महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सध्या ३५ लाखांच्या घरात आहे. २०५१ मधील शहराची लोकसंख्या सुमारे १ कोटीच्या घरात राहील. त्यानुसार शहराला किमान ८०० एमएलडी पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता आहे. परिणामी, पाणी पुरवठा नवीन जलस्त्रोत निर्मिती आणि सुरू असलेल्या योजना सक्षमपणे राबवण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी संबंधित विभागाचे मंत्री महोदय आणि प्रमुख अधिकारी यांची आढावा बैठक घ्यावी आणि ‘ॲक्शन प्लॅन’ तयार करावा, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.

याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, सध्यस्थितीला शहरासाठी पवना, आंद्रा, भामा आसखेड धरणातून पाणी उपलब्ध होते. पवना बंद जलवाहिनी प्रकल्पावरील ‘जैसे थे’ आदेश उठवण्यात आला आहे. मात्र, अद्याप काम सुरू झालेले नाही. आंद्रा धरणातून १०० एमएलडी पाण्याचा पुरवठा सुरू झाला आहे. भामा आसखेड प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. सदरचे काम गतीमान करण्याची आवश्यकता आहे. दरम्यान, वाढती लोकसंख्या आणि शहराची गरज लक्षात घेता चासकमान, ठोकरवाडी आणि मुळशी धरणातून शहरासाठी पाणी आरक्षीत करण्याबाबत राज्य सरकारकडे प्रस्ताव आहे. शहरातील वाढत्या गृहनिर्माण सोसायटींमध्ये पाणी पुरवठा बाबत तक्रारी निर्माण होत आहे. त्या अनुशंगाने नवीन जलस्त्रोतांबाबत प्रशासनाची तयारी, सुरू असलेले पवना बंद जलवाहिनी आणि आंद्रा-भामा-आसखेड प्रकल्पाच्या कामाला गती देणे आणि शहराचा पाणी पुरवठा सक्षम करणे याबाबत मा. जलसंपदा मंत्री, मा. नगरविकास मंत्री यांच्यासह संबंधित विभागाचे मंत्री महोदय आणि उच्चाधिकारी यांची आढावा बैठक आपल्या अध्यक्षतेखाली नियोजित करावी, अशी विनंतीही आमदार लांडगे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे.

---

# निगडीत ‘डक्ट’मध्ये उतरलेल्या तिघांचा मृत्यू

## श्वास गुदमरून मृत्यू झाल्याचा अंदाज

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत संचार निगम लिमिटेड (बीएसएनएल)च्या फायबर ऑप्टिकल ‘डक्ट’मध्ये उतरलेल्या तीन कामगारांचा मृत्यू झाला. श्वास गुदमरल्याने मृत्यू झाल्याचा अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे. निगडी, प्राधिकरणात शुक्रवारी ही घटना घडली.**



दत्तात्रय होनाळे हे ठेकेदार होते, तर इतर दोघे कामगार होते. त्यामुळे अद्याप कोणावरही गुन्हा दाखल केला नाही. आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. बीएसएनएल अधिकाऱ्यांची चौकशी केली जाईल. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येईल.
**-संदीप आटोळे,** पोलीस उपायुक्त

लखन अश्रूबा धावरे (वय ३५), दत्तात्रय विजयकुमार व्हनाळे (वय ३८, दोघे रा. चिंचवड, मूळ धाराशिव), साहेबराव संभाजी गीरशेटे (वय ३५, रा. बिजलीनगर, चिंचवड, मूळ चंद्रपूर) अशी मृत्यू झालेल्या कामगारांची नावे आहेत. होनाळे हे ठेकेदार होते. डक्टमध्ये न उतरलेले बाबासाहेब अंबादास वाघ (वय ५२, रा. इंद्रायणीनगर, आळंदी) हे बचावाचले आहेत.

निगडी ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बानसोडे यांनी याबाबत माहिती दिली. ऑप्टिक फायबरसाठी बीएसएनएलचे शहरात ठिकठिकाणी दहा बाय दहाच्या चौकोनी आकाराचे डक्ट आहेत. बीएसएनएलच्या आकुर्डी कार्यालयातील ठेकेदार होनाळे आणि तीन कंत्राटी कामगार शुक्रवारी दुपारी ऑप्टिकल फायबरच्या देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी प्राधिकरण येथे गेले होते. तीन फूट खोल पाणी असलेल्या डक्टमध्ये अगोदर साहेबराव उतरले. त्यांना गुदमरल्यासारखे होऊ लागल्याने त्यांना वाचवण्यासाठी दत्तात्रय आणि लखन डक्टमध्ये उतरले. हवाबंद जागेत तिघांनाही त्रास होऊ लागला. बाबासाहेब यांनी आवाज दिला, मात्र आतून काहीच प्रतिसाद येत नसल्यामुळे घाबरलेल्या बाबासाहेब यांनी आरडाओरड केली. परिसरातील नागरिकांनी अग्निशमन दल, निगडी पोलिसांना संपर्क साधला. कामगारांना बाहेर बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले, मात्र, डॉक्टरांनी लखन, साहेबराव व दत्तात्रय यांना मयत घोषित केले. शवविच्छेदन केल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. शुक्रवारी रात्री उशिरा नातेवाईक मृतदेह घेऊन मुळगावी गेले आहेत.

# कोण देणार या प्रश्नांची उत्तरे?



भूमिका

**संसदेच्या दोन्ही सभागृहांत विरोधकांनी बहिष्कार (चांगल्या कारणांसाठी) घातल्याच्या चर्चेनंतर भारतीय दंड संहिता, भारतीय पुरावा कायदा, १८७२ ही तीन विधेयके बदलून मंजूर करण्यात आली. विधेयकांच्या इंग्रजी आवृत्त्यांमध्येही नवीन विधेयकांना हिंदी (किंवा संस्कृत) नावे आहेत. राष्ट्रपतींनी या विधेयकांना मान्यता दिली आणि हे आता नवीन कायदे १ जुलै २०२४ पासून लागू होतील.**



या नव्या कायद्यांना अनेक स्तरांतून तीव्र विरोध होत आहे. सरकारने या विरोधाची कारणे अप्रासंगिक आणि विशिष्ट हेतूने प्रेरित असल्याचे सांगत विरोध फेटाळून लावला आहे. पण सरकारच्या या दृष्टिकोनामुळे या कायद्यांना होणारा विरोध थांबलेला नाही. उलट दोन राज्य सरकारांनी तर ते संबंधित राज्यांच्या विधानसभांमध्ये या विधेयकांमध्ये त्यांना आवश्यक ते बदल करतील असे जाहीर केले आहे. महिनाभरात बदल सुचवण्यासाठी तामिळनाडूने एकसदस्यीय समिती नेमली आहे. कर्नाटक आणि इतर राज्य सरकारे हाच मार्ग स्वीकारू शकतात. त्यामुळे या संदर्भातली वस्तुस्थिती आणि प्रश्न लोकांसमोर ठेवणे आणि त्यांना स्वत:लाच निष्कर्ष काढायला सांगणे मला आवश्यक वाटते.'फौजदारी कायदा' हा राज्यघटनेच्या समवर्ती यादीतील एक विषय आहे. संसद आणि राज्य विधानमंडळे असे दोघेही या विषयावर कायदे करू शकतात. पण, संसदेने केलेला कायदा आणि राज्य विधानमंडळाने केलेला कायदा असे दोन्ही कायदे परस्परविरोधी असतील तर, राज्यघटनेचे कलम २५४ लावले जाऊ शकते. अर्थात राज्य विधानसभेने कायदा केल्यानंतर दोन्हीकडच्या कायद्यांमध्ये विरोधाभास असेल आणि राष्ट्रपतींनी राज्य विधिमंडळाने संमत केलेल्या कायद्याला संमती दिली नाही, तरच हा प्रश्न उद्भवेल.दरम्यान, नव्या कायद्यांना विरोध करणाऱ्यांनी उपस्थित केलेले प्रश्न समजून घेऊन सरकारने त्यांची उत्तरे दिली पाहिजेत. पण दुर्दैवाने केंद्र सरकारने संसदेत किंवा बाहेर या प्रश्नांची उत्तरे देण्यास नकार दिला आहे. हे प्रश्न पुढीलप्रमाणे आहेत:तीन नवीन कायद्यांच्या तरतुदींपैकी बहुतांश तरतुदी आधीच्या तीन कायद्यांमधून 'जशाच्या तशा' घेतल्या गेल्या आहेत, हे बरोबर आहे का? भारतीय दंडविधान संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहितेतील ९० ते ९५ टक्के तरतुदी, तसेच पुरावा कायद्यातील ९५ ते ९९ टक्के तरतुदी नव्या कायद्यात तशाच ठेवण्यात आल्या आहेत. आणि प्रत्येक कलमाला नवे क्रमांक देण्यात आले आहेत, हे बरोबर आहे का? सध्याच्या कायद्यांमध्ये काही भर घालणे, वगळणे आणि बदल करणे आवश्यक असते, तर तोच परिणाम दुरुस्त्या करून साधता आला नसता का? असे जर असेल तर आपण 'वसाहतिक वारसा' फेकून दिला आहे, हा या सरकारचा दावा पोकळ नाही का? गुन्हेगारी कायदे बऱ्याच प्रमाणात ठेवून त्यात काही फेरबदलच करायचे होते, तर कायदा आयोगाचा संदर्भ देण्याची प्रथा का पाळली गेली नाही? सर्व संबंधितांनी सल्लामसलत करून हा विधेयकाचा मसुदा त्याच्या शिफारसींसह सादर करावा, त्यावर सरकार आणि संसदेने विचार करावा यासाठी कायदा आयोग ही सर्वात योग्य संस्था नव्हती का? या प्रक्रियेसाठी पूर्ण वेळ कायदा आयोग असताना त्याला बाजूला करून विविध विद्यापीठांमध्ये प्राध्यापक म्हणून काम करणाऱ्या, या कामासाठी थोडाच वेळ देऊ शकणाऱ्या सदस्यांच्या समितीकडे हे काम का सोपवण्यात आले? नवीन कायदे फौजदारी न्यायशास्त्राच्या आधुनिक तत्त्वांशी सुसंगत आहेत का? गेल्या दहा वर्षांत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासिक निकालांमध्ये या नवीन कायद्यांतील तरतुदींचा आणि प्रगतिशील तत्त्वांचा समावेश करण्यात आला आहे का? नवीन कायद्यातील अनेक तरतुदी सर्वोच्च न्यायालयाने म्हटल्याप्रमाणे राज्यघटनेच्या विरोधात आहेत का?अनेक लोकशाही देशांमध्ये रद्द करण्यात आलेली 'मृत्युदंड' ही शिक्षा नवीन कायद्याने कायम का ठेवली आहे? 'एकांतवासा'ची क्रूर आणि अमानवी शिक्षा नव्याने का सुरू केली गेली आहे? 'व्यभिचार' हा गुन्हा पुन्हा फौजदारी कायद्यात का आणला गेला आहे? 'बदनामी' हा फौजदारी गुन्हा म्हणून कायम ठेवणे आवश्यक होते का? 'बदनामी'ची फौजदारी तक्रार दाखल करण्यासाठी मर्यादा घालणे आवश्यक नव्हते का? समोरच्या व्यक्तीच्या संमतीशिवाय समलिंगी संबंध ठेवणे हा गुन्हा का नाही?

## प्रासंगिक »

### शक्तिपीठ महामार्ग?

***जमिनी जबरदस्तीने काढून घेऊनत्यांना भूमिहीन बनवणे हे त्यांना आत्महत्येकडे ढकलण्यासारखेच होय.***

शक्तिपीठ महामार्गासाठी १२ जिल्ह्यांच्या २७ हजार एकर जमिनी संपादित केल्या जाणार आहेत. तसेच ८६ हजार कोटी रुपये एवढा प्रस्तावित खर्च आहे. पाच वर्षांमध्ये तो पूर्ण करण्याचे लक्ष्य असले तरी त्याचा आवाका पाहता मुंबई गोवा महामार्गाप्रमाणे किमान दहा वर्षे लागू शकतात. म्हणजे याचा खर्च ८६ हजार कोटींपेक्षा दुप्पट तिप्पट होऊ शकतो. ज्या १२ जिल्ह्यांतून महामार्ग जाणार आहे, त्यातील बहुतांश जमिनी बागायती आहेत. त्यामुळे या पट्ट्यांमध्ये विरोध जास्त होताना दिसतो. या जमिनी आपोआपच बागायती बनलेल्या नाहीत. शेतकऱ्यांच्या मागील अनेक पिढ्या या शेतजमिनी बागायती करण्यासाठी झिजल्या आहेत. भूमिलेख अधिकाऱ्यांनी या नोंदी करण्याकडे साफ दुर्लक्ष केलेले दिसते. शासनाने कायमच्या नापीक, पडीक जमिनींचा छोटे छोटे विशिष्ट प्रकल्प उभारण्यासाठी केला पाहिजे आणि बागायती जमिनींची निवड टाळली पाहिजे. त्याचबरोबर आहे.

राज्यसभेतील 'आप'च्या खासदार स्वाती मालीवाल यांचा वरिष्ठ सभागृहातील प्रवेश लक्षवेधी होता. खासदारपदाची शपथ घेतानाच त्यांनी घोषणाबाजी केली होती. सभापतींनी त्यांची शपथ नामंजूर केली. त्यांना परत शपथ घ्यावी लागली होती. दुसऱ्या वेळी मात्र मालीवाल यांनी लिहून दिलेलं वाचलं.

## बिनापक्ष सदस्यत्व टिकवून ठेवावं लागेल




शपथ घेताना घोषणाबाजी वा स्वत:चे शब्द शपथपत्रात घालायचे नसतात. शपथेचा विहित नमूना ठरलेला असतो, त्याव्यतिरिक्त कोणताही शब्द ग्राह्य धरला जात नाही. लोकसभेत दोन्ही बाजूच्या सदस्यांनी घोषणाबाजी केली, सभागृहाचे सदस्य नसलेल्या व्यक्तींची, नेत्यांची नावे घेतली. वरिष्ठ सभागृहात असे प्रकार फारसे होत नाहीत पण, मालीवाल उत्साहात होत्या. त्यांना सभागृहात अस्तित्व दाखवायचं असेल, म्हणून त्यांनी घोषणाबाजी केली. पण, थोड्याच दिवसांमध्ये चित्र पालटलेलं दिसलं. केजरीवालांच्या खासगी सचिवाने त्यांना मारहाण केल्याप्रकरणी मालीवाल आता 'आप'च्या राहिलेल्या नाहीत. खरंतर त्या बिनपक्षाच्या खासदार झाल्या आहेत. संसदेच्या अधिवेशनामध्ये त्यांनी हजेरी लावली होती. पण, त्या एकट्याच मागच्या आसनावर बसलेल्या दिसल्या. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाच्या चर्चेत विरोधकांकडून गोंधळ घातला जाणार याची मालीवाल यांना कल्पना होतीच. विरोधक आक्रमक झाल्याचे दिसताच मालीवाल सभागृहाच्या बाहेर निघून गेल्या. मालीवाल यांची खासदारकीची सहा वर्षे बाकी आहेत. मग, त्या सदस्यत्वाचा राजीनामा कशाला देतील? नाहीतर त्यांना राजीनामा देऊन भाजपमध्ये जावं लागेल. भाजपनं पुन्हा उमेदवारी दिली तर त्या राज्यसभेच्या खासदार होतील. तसं करायचं नसेल तर त्यांना बिनापक्ष सदस्यत्व टिकवून ठेवावं लागेल. संसदेच्या आवारातही त्या एकट्याच वावरताना पाहायला मिळतं. पत्रकारांनीही त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला. पण, मी मीडियाशी आता काही बोलणार नाही असं म्हणून त्या निघून गेल्या. 'इंडिया' आघाडीतील कोणी त्यांच्या मदतीला येणार नाहीत आणि भाजपमध्ये गेल्याशिवाय सत्ताधारीही बघणार नाही अशी मालीवालांची कोंडी झाल्याचे अधिवेशनामध्ये पहायला मिळाले.लोकसभा असो वा राज्यसभा, सभागृहात काय चाललंय हे संसद टीव्हीवर दिसत नाही. कारण, कॅमेरे सतत लोकसभाध्यक्षांवर वा सभापतींवर खिळलेले असतात. विरोधी पक्षांच्या सदस्यांचे काय चाललंय हे फक्त तुम्ही सभागृहाच्या कक्षांमध्ये असाल तरच समजेल. सभागृहातील गोंधळाचा आवाज ऐकू येईल पण, कोण काय करतंय हे कळणार नाही. राज्यसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींचं भाषण सुरू होतं.खरंतर माइक सुरू नसला तरी, विरोधी पक्षनेत्यांचं बोलणं पीठासीन अधिकाऱ्यांना ऐकू येतं. इतरवेळी ते सातत्याने त्यांना खाली बसवत असतात. ते बोलायला लागले की, त्यांना अडवून सभागृहाच्या प्रतिष्ठेचं भान दिलं जातं. पण, मोदी बोलायला लागले आणि पीठासीन अधिकाऱ्यांनी मान उजवीकडं वळवली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## ठाकरे यांना टोला

## विकासाची हंडी लावणार; मुख्यमंत्री यांचा ठाकरे यांना टोला

# पालिकेतील पापाची हंडी आम्ही फोडली!

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिकेतील पापाची हंडी आम्ही फोडली आहे. आता तेथे नवीन विकासाची हंडी लागेल आणि त्या विकासाच्या हंडीतील लोणी जनसामान्यांपर्यंत नेण्याचा आमचा प्रयत्न आहे. महापालिकेतील लोणी कोणी खाल्ले हे जनतेला माहित आहे. त्यामुळे यंदा महानगरपालिकेत परिवर्तन अटळ आहे, असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना लगावताना दहीहंडी कार्यक्रमाच्या माध्यमातून मुंबई महापालिका निवडणूक प्रचाराचा नारळच फोडला.**

## दहीहंडी, गणेश उत्सवावर बंधने



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दहिहंडी उत्सवानिमित्त मुंबई शहर, उपनगर तसेच ठाणे, नवी मुंबईतील गोविंदांना भेटी देत गोविंदाचा उत्साह वाढवला. फडणवीस यांनी प्रथम वरळी येथील जांबोरी मैदान येथे आयोजित केलेल्या परिवर्तन दहीहंडी उत्सवाला भेट दिली. यावेळी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना फडणवीस यांनी ठाकरे गटाला लक्ष्य केले. महापालिकेतील पापाची हंडी आम्ही फोडली, तिथे नवीन विकासाची हंडी लागली जाईल, असे ते म्हणाले. यावेळी, इतकी वर्षे लोणी कुठे जात होते, हे जनतेला माहीत आहे, असा टोलाही त्यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला.दहीहंडी, गणेश उत्सवावर बंधने होती, सगळी बंधने एकनाथ शिंदे यांचे सरकार असताना हटवण्यात आली. आता आमचे सरकार असून सगळी बंधने हटवण्यात आलेली असून राज्यभरात प्रचंड उत्साह सुरू आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. याच उत्साहात दंहीहंडी साजरी होते आहे.ऑपरेशन सिंदूर द्वारे भारतीय सैन्य दलाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा निर्धार आणि विचार प्रत्यक्षात उतरवला. पाकिस्तानमधील दहशतवादी ठिकाणे नष्ट करून शत्रूला धडा शिकविला आणि आपल्या शौर्याची जगासमोर प्रचीती दिली आहे. आजच्या या दहीहंडी उत्सवातून गोविंदा पथकांनी सैन्य दलाच्या शौर्याला सलाम करण्याचे सुंदर काम केले आहे," असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

घाटकोपर येथील लालबहादूर शास्त्री मार्गावर आयोजित दहीहंडी उत्सव प्रसंगी मुख्यमंत्र्यांनी उपस्थित सैन्य दलातील जवानांना भेटून संवाद साधला. कार्यक्रमास सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, आमदार प्रवीण दरेकर, आ. राम कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

## नवीन विकासाची हंडी लागेल

घाटकोपर येथील लालबहादूर शास्त्री मार्गावर आयोजित दहीहंडी उत्सव प्रसंगी मुख्यमंत्र्यांनी उपस्थित सैन्य दलातील जवानांना भेटून संवाद साधला. कार्यक्रमास सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, आमदार प्रवीण दरेकर, आ. राम कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.महापालिकेतील पापाची हंडी आम्ही फोडली आहे. आता तेथे नवीन विकासाची हंडी लागेल.

प्रमुख उपस्थिती होती.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दहिहंडी उत्सवानिमित्त मुंबई शहर, उपनगर तसेच ठाणे, नवी मुंबईतील गोविंदांना भेटी देत गोविंदाचा उत्साह वाढवला. फडणवीस यांनी प्रथम वरळी येथील जांबोरी मैदान येथे आयोजित केलेल्या परिवर्तन दहीहंडी उत्सवाला भेट दिली. यावेळी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना फडणवीस यांनी ठाकरे गटाला लक्ष्य केले. महापालिकेतील पापाची हंडी आम्ही फोडली, तिथे नवीन विकासाची हंडी लागली जाईल, असे ते म्हणाले. यावेळी, इतकी वर्षे लोणी कुठे जात होते, हे जनतेला माहीत आहे, असा टोलाही त्यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला.दहीहंडी, गणेश उत्सवावर बंधने होती, सगळी बंधने एकनाथ शिंदे यांचे सरकार असताना हटवण्यात आली. आता आमचे सरकार असून सगळी बंधने हटवण्यात आलेली असून राज्यभरात प्रचंड उत्साह सुरू आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. याच उत्साहात दंहीहंडी साजरी होते आहे.ऑपरेशन सिंदूर द्वारे भारतीय सैन्य दलाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा निर्धार आणि विचार प्रत्यक्षात उतरवला. पाकिस्तानमधील दहशतवादी ठिकाणे नष्ट करून शत्रूला धडा शिकविला आणि आपल्या शौर्याची जगासमोर प्रचीती दिली आहे. आजच्या या दहीहंडी उत्सवातून गोविंदा पथकांनी सैन्य दलाच्या शौर्याला सलाम करण्याचे सुंदर काम केले आहे," असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

# मुसळधार पावसामुळे सखलभाग जलमय

## कोंडीने नागरिकांचे हाल, झोपडपट्ट्या चाळींमधील घरात पाणी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबईत शुक्रवारी मध्यरात्रीपासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे शनिवारी मुंबईकरांची त्रेधा उडाली. मुसळधार पावसामुळे पूर्व आणि पश्चिम उपनगरांतील अनेक सखलभाग जलमय झाल्याने त्याचा वाहतुकीवर परिणाम झाला. झोपडपट्ट्या, चाळींमध्ये पाणी साचल्यामुळे रहिवाशांचे अतोनात हाल झाले.**



दरम्यान, मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेची आपत्कालीन पथके, कामगार, अभियंते, पंप ऑपरेटर ठिकठाकाणी तैनात होते. मात्र सखलभागात साचलेल्या पावसाच्या पाण्यामुळे मुंबईकरांचे प्रचंड हाल झाले. दरम्यान, विक्रोळीमधील पार्कसाईट परिसरात शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास एका घरावर डोंगराचा काही भाग कोसळला. या दुर्घटनेत एकाच कुटुंबातील पिता आणि मुलीचा मृत्यू झाला. तर आई, मुलगा आणि शेजारी राहणारे अन्य दोघेजण जखमी झाले असून जखमींवर घाटकोपराच्या राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मुंबईत ऑगस्टच्या सुरुवातीपासून पावसाने दडी मारली होती. त्यानंतर, मुंबईत शुक्रवारी मध्यरात्रीपासून पावसाने दमदार हजेरी लावली. पावसाचा जोर शनिवारीही कायम होता. दरम्यान, हवामान खात्याने मुंबईत अतिमुसळधार (रेड अलर्ट) पावसाचा इशारा दिल्याने महानगरपालिकेने सर्व यंत्रणा तैनात केल्या होत्या. मुसळधार पावसामुळे शहर आणि उपनगरातील अनेक सखलभाग जलमय झाले. विविध ठिकाणी झालेल्या वाहतूक कोंडीमुळे मुंबईकरांना प्रचंड हाल झाले. मुसळधार पावसामुळे शनिवारी जोगेश्वरी, चुनाभट्टीतील एव्हरर्ड नगर, गुलमोहर लेन, माटुंगा येथील गांधी मार्केट परिसर जलमय झाला.

## २.५ ते ३ फूट पाणी साचले

तसेच, अँटॉप हिल येथील एमजीआर चौक व काणे नगर बसस्थानक येथे सुमारे एक ते दीड फूट पाणी साचले होते. त्यामुळे तेथील वाहतूक संथ गतीने सुरू केली. प्रतीक्षा नगरात साचलेल्या पाण्याचा वेळेत निचरा होऊ शकला नाही. तेथे साधारण ३ ते ४ तास पाणी साचले होते.आरे मेट्रो कारशेडजवळील मेट्रो पुलाखालीही २.५ ते ३ फूट पाणी साचले होते.

न्यायालयाला इशारा

## केंद्र सरकारचा सर्वोच्च न्यायालयाला इशारा

# राज्यपालांच्या मुदतीवर घेतला आक्षेप!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राज्य विधिमंडळाने सादर केलेल्या विधेयकांवर कारवाई करण्यासाठी राष्ट्रपती आणि राज्यपालांना तीन महिन्यांची मुदत देण्याच्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाला केंद्र सरकारने विरोध केला आहे. केंद्र सरकारचे महाधिवक्ता तुषार मेहता यांनी म्हटले की, लोकशाहीत न्यायालयांकडे सर्व प्रश्नांची उत्तरे नाहीत. "जर लोकशाहीतील एखाद्या घटकाला (राज्य) दुसऱ्या घटकावर शिरजोरी करण्याची संधी दिली तर त्याचे रुपांतर संवैधानिक अव्यवस्थेत होतील", असे तुषार मेहता म्हणाले.**

## न्यायालयाकडे प्रश्नांची उत्तरे नाहीत



केंद्र सरकारने आपले म्हणणे तुषार मेहता यांच्यामार्फत सर्वोच्च न्यायालयाकडे लिखित स्वरुपात दिले आहे.१२ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर राष्ट्रपती आणि राज्यपालांना राज्यांच्या विधेयकांवर स्वाक्षरी करण्यासाठी वेळापत्रक निश्चित करता येईल का? यावर सुनावणी सुरू असताना मेहता यांनी कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायपालिका यांच्यातील अधिकारांच्या विभाजनाचे (SEPARATION OF POWERS) महत्त्व अधोरेखित केले होते. तुषार मेहता यांनी सांगितले की, अधिकारांचे पृथक्करण हा संवैधानिक चौकटीचा भाग असला तरी काही वर्षांपासून, व्यावहारिक वापरात काही प्रमाणात एकमेकांवर अतिव्याप्ती (OVERLAP) होणे आणि नियंत्रण येणे किंवा अधिकारांचे मिश्रण तयार झाले आहे.काही क्षेत्रे अशी आहेत, जी तीन अवयवांपैकी कोणत्याही एका घटकासाठीच मर्यादीत राहतात. इतरांना त्यावर ताबा मिळवता येत नाही. राज्यपाल आणि राष्ट्रपती सारखे उच्च पदे त्यातच मोडतात. जरी ती राजकीय पदे असली तरी ती लोकशाहीच्या इच्छाशक्तीचे प्रतिनिधित्वही करतात", असेही महाधिवक्ता तुषार मेहता म्हणाले.

मेहता पुढे म्हणाले, "राष्ट्रपती पदासाठी निवडणूक होते आणि राज्यपालांची नियुक्ती मंत्रिमंडळ (राष्ट्रपतींमार्फत कार्य करणारे) करते. लोकशाहीमध्ये थेट निवडणुका हा लोकशाही प्रक्रियेचा एकमेव प्रकार नाही. तर निवडून आलेले प्रतिनिधींद्वारे केल्या जाणाऱ्या नियुक्त्याही लोकाशाहीवरच्या आस्थेचे कायदेशीर केंद्र आहे."

राज्यापालांबद्दल बोलताना मेहता म्हणाले की, संघराज्याच्या चौकटीमध्ये राज्यपालांना परके मानले जाऊ शकत नाही. राज्यपाल हे केवळ केंद्राचे दूत नसून ते संघराज्यीय व्यवस्थेतील

## केंद्र सरकारने विरोध केला

संघराज्याच्या चौकटीमध्ये राज्यपालांना परके मानले जाऊ शकत नाही. राज्यपाल हे केवळ केंद्राचे दूत नसून ते संघराज्यीय व्यवस्थेतील संपूर्ण राष्ट्राचे प्रतिनिधी असतात.राज्य विधिमंडळाने सादर केलेल्या विधेयकांवर कारवाई करण्यासाठी राष्ट्रपती आणि राज्यपालांना तीन महिन्यांची मुदत देण्याच्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाला केंद्र सरकारने विरोध केला आहे.

संपूर्ण राष्ट्राचे प्रतिनिधी असतात.
केंद्र सरकारने आपले म्हणणे तुषार मेहता यांच्यामार्फत सर्वोच्च न्यायालयाकडे लिखित स्वरुपात दिले आहे.१२ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर राष्ट्रपती आणि राज्यपालांना राज्यांच्या विधेयकांवर स्वाक्षरी करण्यासाठी वेळापत्रक निश्चित करता येईल का? यावर सुनावणी सुरू असताना मेहता यांनी कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायपालिका यांच्यातील अधिकारांच्या विभाजनाचे (SEPARATION OF POWERS) महत्त्व अधोरेखित केले होते. तुषार मेहता यांनी सांगितले की, अधिकारांचे पृथक्करण हा संवैधानिक चौकटीचा भाग असला तरी काही वर्षांपासून, व्यावहारिक वापरात काही प्रमाणात एकमेकांवर अतिव्याप्ती (OVERLAP) होणे आणि नियंत्रण येणे किंवा अधिकारांचे मिश्रण तयार झाले आहे.काही क्षेत्रे अशी आहेत, जी तीन अवयवांपैकी कोणत्याही एका घटकासाठीच मर्यादीत राहतात. इतरांना त्यावर ताबा मिळवता येत नाही. राज्यपाल आणि राष्ट्रपती सारखे उच्च पदे त्यातच मोडतात. जरी ती राजकीय पदे असली तरी ती लोकशाहीच्या इच्छाशक्तीचे प्रतिनिधित्वही करतात", असेही महाधिवक्ता तुषार मेहता म्हणाले.

मेहता पुढे म्हणाले, "राष्ट्रपती पदासाठी निवडणूक होते आणि राज्यपालांची नियुक्ती मंत्रिमंडळ (राष्ट्रपतींमार्फत कार्य करणारे) करते. लोकशाहीमध्ये थेट निवडणुका हा लोकशाही प्रक्रियेचा एकमेव प्रकार नाही.

# बिहारमध्ये आजपासून 'व्होटर अधिकार यात्रा

## विधानसभा निवडणुकीसाठी राहुल गांधींचे बिगुल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पाटणापासून तीन तासांच्या अंतरावर, दक्षिण बिहारच्या सासाराममधून काँग्रेसचे नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी रविवारी विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजवतील. सासारामपासून राहुल गांधींची 'व्होटर अधिकार यात्रा' सुरू होईल. या यात्रेच्या निमित्ताने केंद्रीय निवडणूक आयोगाला आणखी कोंडीत पकडण्याची रणनिती काँग्रेसने आखल्याचे मानले जात आहे.**



यात्रेमध्ये राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव हेही सहभागी होणार असल्याची माहिती काँग्रेस नेत्यांनी दिली. केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) मोहिमेअंतर्गत जाहीर केलेल्या मसुदा मतदारयाद्यांमधून बिहारमधील सुमारे ६५ लाख मतदारांना मतदार यादीतून वगळले आहे. या मोहिमेमुळे विरोधक आणि निवडणूक आयोग यांच्यातील तणाव वाढत असताना बिहारमधून राहुल गांधी 'व्होटर अधिकार यात्रा' काढत आहेत. त्यांची ही तिसरी यात्रा आहे.या आधी 'भारत जोडो यात्रा' ही

## मतदारांना मतदार यादीतून वगळले

यात्रेमध्ये राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव हेही सहभागी होणार असल्याची माहिती काँग्रेस नेत्यांनी दिली. केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) मोहिमेअंतर्गत जाहीर केलेल्या मसुदा मतदारयाद्यांमधून बिहारमधील सुमारे ६५ लाख मतदारांना मतदार यादीतून वगळले आहे.

संपूर्ण दक्षिण-उत्तर भारत पदयात्रेने राहुल गांधींनी पालथा घातला होता. त्यानंतर 'भारत जोडो न्याय यात्रा' पूर्व-पश्चिम काढली होती. या दोन्ही यात्रांचा निवडणुकांशी काहीही संबंध नव्हता. पण, ही यात्रा थेट बिहारच्या निवडणुकीचे रणशिंग फुंकणारी असेल.बिहारमधील २० जिल्ह्यांमधून राहुल गांधींची ही यात्रा जाईल. यात्रेचा निश्चित केलेल्या या मार्गावरील प्रत्येक जिल्ह्यामध्ये काँग्रेसचा किमान एक तरी उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरेल असे मानले जात आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने ७० जागा लढवून फक्त १९ जागा जिंकल्या होत्या.

# ‘लाखात एक आमचा दादा’ फेम अभिनेत्री रमली शेतकामात!

मराठी कलाकार हे त्यांच्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकतातच, पण अनेकदा या कलाकारांचा साधेपणाही चाहत्यांना भावतो. मराठी कलाकार हे ग्लॅमरस इंडस्ट्रीत काम करत असले; तरी अनेकदा ही कलाकार मंडळी आयुष्यात अगदी साधेपणाने जगत असतात. मालिका, चित्रपटात स्टार असणारे हे कलाकार वैयक्तिक आयुष्यात अगदी साधेपणाने आयुष्य जगत असतात. अशाच साधेपणा जपणाऱ्या लोकप्रिय अभिनेत्री म्हणजे राजश्री निकम. राजश्री निकम या सोशल मीडियावर कायमच सक्रिय असतात. सोशल मीडियाद्वारे ते त्यांचे अनेक फोटो व व्हिडीओ शेअर करत असतात. त्याचबरोबर कामानिमित्तची माहितीही शेअर करत असतात. अशातच त्यांनी सोशल मीडियावर शेअर केलेला एक व्हिडीओ सर्वांचं लक्ष वेधून घेत आहे.राजश्री यांनी शेअर केलेला हा व्हिडीओ शेतीकामाचा आहे. राजश्री निकम यांनी शेअर केलेल्या या व्हिडीओ त्या कापणी



करतानाचे दिसत आहे. हा व्हिडीओ शेअर करत त्यांनी शेती आणि एन्जॉय असंही म्हटलं आहे. राजश्री निकम यांनी शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये त्या आनंदाने शेतीकाम करत असतानाचे पाहायला मिळत आहे. राजश्री निकम यांनी शेअर केलेला व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.अनेकांनी या व्हिडीओला लाईक्स आणि कमेंट्सद्वारे चांगलाच प्रतिसाद दिला आहे. त्याचबरोबर अनेकांनी अभिनेत्रीच्या साधेपणाचंही कौतुक केलं आहे. अभिनेत्री अश्विनी महांगडेनेही राजश्री यांच्या या व्हिडीओवर प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. अश्विनीने ‘ताई’ अशी कमेंट करत अभिनेत्रीच्या कृतीचं कौतूक केलं आहे. त्याचबरोबर अभिनेत्री सारिका नवाथे यांनीसुद्धा हा व्हिडीओ आवडला असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.दरम्यान, राजश्री निकम या सध्या झी मराठी वाहिनीवरील ‘लाखात एक आमचा दादा’ या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत.

## दीपिका कक्करला ट्यूमर

टीव्ही अभिनेत्री दीपिका कक्कर दुसऱ्या टप्प्यातील यकृताच्या कर्करोगाने ग्रस्त आहे. एका महिन्यापूर्वी तिच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती ज्यामध्ये तिच्या यकृतातून टेनिस बॉलच्या आकाराचा ट्यूमर काढण्यात आला होता. अलीकडेच दीपिका पुन्हा पती शोएब इब्राहिमसह रुग्णालयात गेली होती. आता एका नवीन व्लॉगमध्ये शोएब इब्राहिमने खुलासा केला आहे की ट्यूमर शस्त्रक्रियेदरम्यान दीपिकाच्या यकृताचा काही भाग देखील कापावा लागला.नवीन व्लॉगमध्ये, दीपिका कक्कर आणि शोएब इब्राहिम त्यांचा मुलगा रुहान आणि पुतण्या हैदरसाठी खरेदी करताना दिसत आहेत. खरेदी केल्यानंतर घरी परतताना, दीपिका खूप थकलेली दिसते, ज्यावर शोएब म्हणतो “कधीकधी थकवा येतो आणि काहीही असो, शस्त्रक्रियेला फक्त एक महिना झाला आहे. यकृताचा एक भाग काढावा लागला.”शोएब इब्राहिम हाताने आकार दाखवत पुढे म्हणतो “तिच्या यकृताचा इतका भाग गेला आहे, इतका मोठा ट्यूमर आणि इतका भाग गेला आहे.”आज माझे टाके देखील काढले गेले आहेत.” मग शोएब म्हणतो “डॉक्टर म्हणत होते की कधीकधी असा दिवस येतो जेव्हा तुम्हाला काहीही करावेसे वाटत नाही.

## सोनालीचा मराठमोळा अंदाज!



मराठी कलाविश्वाची ‘अप्सरा’ म्हणून अभिनेत्री सोनाली कुलकर्णीला ओळखलं जातं. ‘नटरंग’, ‘हिरकणी’, ‘मितवा’, ‘पोश्टर गर्ल’ अशा बऱ्याच गाजलेल्या चित्रपटांमध्ये सोनालीने प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. अभिनेत्री सोशल मीडियावर कायम सक्रिय असते. आपल्या वैयक्तिक जीवनातील प्रत्येक अपडेट सोनाली इन्स्टाग्रामवर शेअर करत असते. तिचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. नुकताच अभिनेत्रीने शेअर केलेला डान्स व्हिडीओ सर्वत्र चर्चेत आला आहे. अलीकडच्या काळात सोशल मीडियावर नवनवीन गाणी व्हायरल होत असतात. सध्या इन्स्टाग्रामवर एका व्हायरल कवितेने सर्वांचं मन जिंकून घेतलं आहे. ही कविता वैभव जोशी आणि अमर ओक यांच्या ऋतू बरवा कार्यक्रमामुळे चर्चेत आली आहे. या कवितेच्या ओळी आहेत…या व्हायरल कवितेने सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घातल्याचं पाहायला मिळत आहे. सोनाली कुलकर्णीला देखील या गाण्याची भुरळ पडली आहे. सध्या सोनाली कामानिमित्त इंग्लंड दौऱ्यावर आहे. याठिकाणी मराठमोळा लूक करून सोनालीने व्हायरल गाण्यावर ठेका धरल्याचं पाहायला मिळत आहे.सोनाली लिहिते, “व्हायरल कवितेवर REEL व्हिडीओ बनवला नाही तर पाप लागेल…आणि ती संधी इंग्लंडमध्ये युरोपियन मराठी संमेलनच्या निमित्ताने मिळाली. अशी संधी मिळत असेल तर का बरं सोडावी?”सोनालीच्या या व्हिडीओवर नेटकऱ्यांसह मराठी कलाकारांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. “खूप छान सोनाली मॅडम”, “पैठणीच्या कोणत्याही ड्रेसमध्ये ताई तू सुंदरच दिसतेस… आणि आज मराठमोळा लूक करून डान्स… कमाल”, “ट्रेंड सेटर सोनाली मॅम” अशा प्रतिक्रिया अभिनेत्रीने या व्हिडीओवर दिल्या आहेत.दरम्यान, सोनाली कुलकर्णीच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर येत्या काळात ती ‘मोगलमर्दिनी छत्रपती ताराराणी’ या सिनेमात प्रमुख भूमिका साकारताना दिसेल. हा सिनेमा कथालेखक आणि इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांनी लिहिलेल्या मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई या पुस्तकावर आधारित आहे.मराठी कलाविश्वाची ‘अप्सरा’ म्हणून अभिनेत्री सोनाली कुलकर्णीला ओळखलं जातं. ‘नटरंग’, ‘हिरकणी’, ‘मितवा’, ‘पोश्टर गर्ल’ अशा बऱ्याच गाजलेल्या चित्रपटांमध्ये सोनालीने प्रमुख भूमिका साकारल्या आहेत.

## स्क्विड गेम 3’ च्या शेवटावर प्रेक्षकांची नाराजी

दक्षिण कोरियाची वेबसीरीज ‘स्क्विड गेम’ पहिल्या भागापासून ओटीटी विश्वात धुमाकूळ घालत आहे. २७ जून रोजी या मालिकेचा तिसरा आणि अखेरचा सीझन प्रदर्शित झाला. प्रदर्शन झाल्यानंतर या मालिकेने अनेक विक्रम मोडीत काढले आहेत. लाखो चाहत्यांनी बिंज वॉच केल्यामुळे नेटफ्लिक्सचे ॲप काही वेळासाठी क्रॅश झाल्याची बातमीही समोर आली होती. मात्र या सीझनचा शेवट अनेक चाहत्यांना आवडलेला नाही. त्यावरून आता टीका सुरू झाली आहे. दक्षिण कोरियातही याचे पडसाद उमटले असून थेट शेअर बाजारात स्क्विड गेमशी निगडित कंपन्यांच्या समभागात घसरण झाल्याचे पाहायला मिळाले. अखेर या सीरीजचे लेखक, दिग्दर्शक आणि निर्माते ह्वांग डोंग-ह्युक यांनी नेटफ्लिक्स आणि आंतरराष्ट्रीय माध्यमांना मुलाखत देऊन शेवट असा का केला? याची माहिती दिली.स्क्विड गेम वेबसीरीजमधील सर्वच पात्र हे या सीरीजचे सर्वात मोठे शक्तीस्थळ आहे. त्यांचे वैयक्तिक आयुष्य, त्याचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर झालेला परिणाम, संकट समोर असताना त्यांच्यातील समोर आलेले खरे रुप, माणुसकी, लोभ, लालसा आणि हिंस्रपणा या भावना मालिकेत पदोपदी ठासून भरलेल्या आहेत. त्याबरोबर मालिकेत खेळले जाणारे खेळ त्यात अजून रंगत भरतात. पहिल्या सीझनपासून मध्यवर्ती भूमिका असलेले प्लेअर नंबर. ४५६ अर्थात गि-हून हे पात्र प्रेक्षकांच्या मनात घर करून आहे.अभिनेते ली जंग-जे यांनी स्क्विड गेममध्ये गि-हून हे पात्र साकारले आहे. त्यांच्या पात्राशी जगभरातील चाहते जोडले गेले असताना शेवटच्या सीझनमधील अखेरच्या भागात त्यांचा शेवट दाखविण्यात आल्यामुळे चाहते चांगलेच संतापले आहेत. पहिल्या सीझनप्रमाणे हॅप्पी एंडिंगचा कयास बांधलेल्या चाहत्यांना हा मोठा धक्काच होता. यातून दिग्दर्शक आणि



निर्मात्यांवर टीका होऊ लागली. अखेर नेटफ्लिक्सला दिलेल्या मुलाखतीत दिग्दर्शकांनी यावर उत्तर दिले.लेखक, दिग्दर्शक ह्वांग डोंग-ह्युक, अभिनेते ली जंग-जे आणि फ्रंट मॅनचे पात्र रंगविणाऱ्या ह्वांग इन-हो यांनी नेटफ्लिक्सवर तिसऱ्या सीझनबाबत संवाद साधला.

## मानसी १० वर्षे टेलिव्हिजनपासून का दूर होती?

बॉलीवूडची क्वीन कंगना रणौत अभिनयासह तिच्या वक्तव्यांमुळे चर्चेत असते. ती अनेक विषयांवर तिची मतं मांडत असते. लवकरच तिचा ‘इमर्जेन्सी’ चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तिने भारताच्या माजी पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांची भूमिका साकारली आहे. कंगना नेहमीच राजकीय विषयांवर आपले मत मांडत असते. दरम्यान नुकत्याच एका मुलाखतीत तिने राजकीय प्रवेशाबाबत वक्तव्य केले आहे.कंगनाने याअगोदर अनेकदा राजकारणात येण्याबाबत आपले मत व्यक्त केले आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये कंगनाने राजकीय प्रवेशाबाबत मत व्यक्त केले होते. ती म्हणाली होती “जर भगवान कृष्णाची इच्छा असेल तर मी लोकसभा निवडणुकाही लढवेन.”आता नुकत्याच एका मुलाखतीत कंगनाने पुन्हा एकदा राजकीय प्रवेशाबाबत मोठे वक्तव्य केले आहे.सध्या कंगना ‘इमर्जेन्सी’ चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. दरम्यान एका मुलाखतीत तिला तुला देशाची पंतप्रधान बनण्याची इच्छा आहे का? असा प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नाचे उत्तर देत कंगना म्हणाली, ‘मी ‘इमर्जेन्सी’ नावाचा एकच चित्रपट केला आहे. तो चित्रपट पाहिल्यानंतर मी पंतप्रधान व्हावे असे कोणालाच वाटणार नाही. ‘इमर्जेन्सी’ हा आपल्या इतिहासातील सर्वात महत्त्वाचा आणि काळा अध्याय आहे.

नियमात बदल

## देशांतर्गत क्रिकेटमध्ये जायबंदी खेळाडूच्या नियमात बदल

# गंभीर दुखापतीस खेळाडू बदलाची मान्यता!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) देशांतर्गत क्रिकेटमध्ये खेळण्याच्या परिस्थितीच्या नियमात एक बदल केला असून, तो २०२५-२६च्या हंगामापासूनच लागू करण्यात येईल. खेळाडूंच्या गंभीर दुखापती संदर्भातील नियम बदलण्यात आहे.या बदलत्या नियमानुसार सामना सुरू असताना एखादा खेळाडू गंभीर जखमी झाला आणि तो खेळूच शकणार नसेल, तर त्याच्या जागी दुसऱ्या खेळाडूला बदलण्याची मान्यता देण्यात आली आहे. हा नियम आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या कन्कशन नियमाशी साधर्म्य बाळगतो. अर्थात, हा नियम सय्यद मुश्ताक अली ट्रेन्टी-२० किंवा विजय हजारे एकदिवसीय स्पर्धेसाठी लागू करण्यात येणार नाही.**

## दोघांच्या नावावर सामना खेळल्याची नोंद




हा नियम फक्त बहु-दिवसीय स्पर्धांसाठीच मर्यादित असेल. सी. के. नायडू करंडक स्पर्धेपासून या नियमाची अंमलबजावणी सुरू होईल.सामन्यात खेळादरम्यान मैदानात एखाद्या खेळाडूला गंभीर दुखापत झाली, तरच खेळाडू बदलता येईल, असे या नियमात स्पष्टपणे म्हणण्यात आले आहे. अन्य कुठल्याही कारणाने खेळाडू बदल करता येणार नाही. या बदलाविषयी सर्व पंचांना अहमदाबाद येथे झालेल्या शिबिरात कल्पना देण्यात आली आहे. यामध्ये सामना निरीक्षकाचा अंतिम निर्णय असेल आणि त्याला आव्हान देता येणार नाही, असेही 'बीसीसीआय'ने स्पष्ट केले आहे. इंग्लंड दौऱ्यात भारताला ऋषभ पंत आणि इंग्लंडला ख्रिस वोक्सच्या दुखापतीमुळे दहा खेळाडूंसह खेळावे लागले होते. तेव्हा बदली खेळाडूचा नियम करण्यात यावा असा एक मतप्रवाह पुढे आला होता आणि त्याला भारतीय प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी पाठिंबा दिला होता. पंच आणि सामना निरीक्षक यांना जर खेळाडू गंभीररीत्या जखमी असल्याचे जाणवत असेल, तर त्याची शिक्षा संघाला कशाला. एका कमी खेळाडूसह कसे खेळायचे असे गंभीर यांनी म्हटले होते.आंतरराष्ट्रीय क्रिकेट समितीने अद्याप अशा प्रकारचा नियम करण्यासंदर्भात कसलाच विचार केलेला नाही. भारतातील देशांतर्गत क्रिकेटमध्ये वापरण्यात येणारा नियम हा त्यांच्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर असू शकतो. देशांतर्गत क्रिकेटमध्ये या नियमाचा कसा परिणाम होतो हे निश्चितपणे अभ्यासले जाईल.खेळाडू बदली करताना ते समान असले पाहिजेत. म्हणजे फलंदाजाला फलंदाज, गोलंदाजाला गोलंदाज, अष्टपैलूला अष्टपैलू अशा पद्धतीने. बदली खेळाडूंसाठी नावे नाणेफेकीच्या

## नियमाचा कसा परिणाम होतो

एका कमी खेळाडूसह कसे खेळायचे असे गंभीर यांनी म्हटले होते.आंतरराष्ट्रीय क्रिकेट समितीने अद्याप अशा प्रकारचा नियम करण्यासंदर्भात कसलाच विचार केलेला नाही. भारतातील देशांतर्गत क्रिकेटमध्ये वापरण्यात येणारा नियम हा त्यांच्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर असू शकतो. देशांतर्गत क्रिकेटमध्ये या नियमाचा कसा परिणाम होतो हे निश्चितपणे अभ्यासले जाईल.

दरम्यान सादर करणे आवश्यक. डॉक्टर आणि मैदानावरील पंचांशी सल्लामसलत केल्यानंतरच सामना निरीक्षक बदली खेळाडूबाबत अंतिम निर्णय घेतील. – जखमी खेळाडूस ताकीद मिळाली असेल किंवा कारवाईचा इशारा असेल, तर तो बदली खेळाडूस लागू असणार.

– बदली खेळाडूंच्या यादीत राखीव यष्टिरक्षक उपलब्ध नसल्यास यादीबाहेरील खेळाडूला मान्यता. जखमी आणि बदली खेळाडू दोघांच्या नावावर सामना खेळल्याची नोंद केली जाईल. साठीच मर्यादित असेल. सी. के. नायडू करंडक स्पर्धेपासून या नियमाची अंमलबजावणी सुरू होईल.सामन्यात खेळादरम्यान मैदानात एखाद्या खेळाडूला गंभीर दुखापत झाली, तरच खेळाडू बदलता येईल, असे या नियमात स्पष्टपणे म्हणण्यात आले आहे. अन्य कुठल्याही कारणाने खेळाडू बदल करता येणार नाही.

या बदलाविषयी सर्व पंचांना अहमदाबाद येथे झालेल्या शिबिरात कल्पना देण्यात आली आहे. यामध्ये सामना निरीक्षकाचा अंतिम निर्णय असेल आणि त्याला आव्हान देता येणार नाही, असेही 'बीसीसीआय'ने स्पष्ट केले आहे. इंग्लंड दौऱ्यात भारताला ऋषभ पंत आणि इंग्लंडला ख्रिस वोक्सच्या दुखापतीमुळे दहा खेळाडूंसह खेळावे लागले होते. तेव्हा बदली खेळाडूचा नियम करण्यात यावा असा एक मतप्रवाह पुढे आला होता आणि त्याला भारतीय प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी पाठिंबा दिला होता. पंच आणि सामना निरीक्षक यांना जर खेळाडू गंभीररीत्या जखमी असल्याचे जाणवत असेल

# नेशन्स चषकासाठी सुनील छेत्रीला डच्चू

## नवे प्रशिक्षक जमील यांचे संभाव्य संघ निवडताना धक्का तंत्र

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघाचे नवनियुक्त प्रशिक्षक खालिद जमिल यांनी आपल्या पहिल्याच मोहिमेत अनुभवी खेळाडू सुनील छेत्रीला वगळण्याचा निर्णय घेतला. जमील यांनी शनिवारी 'सीएएफए' नेशन्स चषक स्पर्धेसाठी भारताच्या ३५ संभाव्य खेळाडूंची यादी जाहीर केली.**



भारतात प्रतिभावान आक्रमक खेळाडूंची उणीव असल्याचे कारण देत माजी प्रशिक्षक मनेलो मार्क्वेझ यांनी छेत्रीला निवृत्तीचा निर्णय मागे घ्यायला लावून संघात स्थान दिले होते.

या स्पर्धेसाठी आपला विचार करू नये असे छेत्रीने सुचवले होते की बंगळूरु एफसी संघाने अद्याप सरावाला सुरुवात केली नसल्यामुळे त्याला विश्रांती देण्यात आली हे समजू शकले नाही. प्रशिक्षक जमील यांनी निवडलेल्या संघात बंगळूरु एफसी संघातील गोलरक्षक गुरप्रीत सिंग संधू, बचावपटू चिंगलेनसाना सिंग, राहुल भेके, रोशन सिंग नौरेम आणि मध्यरक्षत्रक सुरेश सिंग या खेळाडूंचा समावेश आहे. त्यामुळे छेत्रीला वगळल्यावरून अनेकांनी

## आपली जबाबदारी झटकली

आशियाई चषक पात्रता फेरी स्पर्धेसाठी सराव म्हणून भारतीय या स्पर्धेकडे पाहात आहेत. यामुळेच 'एआयएफएफ'ने निवड झालेल्या सर्व खेळाडूंना त्यांच्या क्लब संघांनी मुक्त करावे असे आवाहन केले आहे. अखिल भारतीय फुटबॉल महासंघाचे (एआयएफएफ) अधिकारी या विषयावर बोलण्यास तयार नाहीत. हा प्रश्न प्रशिक्षकांना विचारा असे सांगून त्यांनी आपली जबाबदारी झटकली आहे.

भुवया उंचावल्या आहेत. अखिल भारतीय फुटबॉल महासंघाचे (एआयएफएफ) अधिकारी या विषयावर बोलण्यास तयार नाहीत. हा प्रश्न प्रशिक्षकांना विचारा असे सांगून त्यांनी आपली जबाबदारी झटकली आहे.या संभाव्य संघाचे सराव शिबीर बंगळूरु येथे सुरू होईल. आतापर्यंत २२ खेळाडू शिबिरात दाखल झाले असून, उर्वरित १३ खेळाडू त्यांच्या संबंधित क्लबकडून ड्युरंड चषक स्पर्धेत खेळत आहेत. नेशन्स चषक स्पर्धेत भारत 'ब' गटात असून, त्यांचे सामने सहयजमान ताजिकिस्तान (२९ ऑगस्ट), इराणविरुद्ध (१ सप्टेंबर) आणि अफगाणिस्तानशी (४ सप्टेंबर) होणार आहेत.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

। रविवार ।

। दि. 17 ऑगस्ट 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती


## सिंधुदुर्ग जिल्हा उत्कर्ष मंडळाचा 47 वा वार्षिक

# कौटुंबिक स्नेहमेळावा उत्साहात साजरा!

### प्रा. बाळकृष्ण रामचंद्र लळीत यांचा "सिंधुदुर्ग भूषण" पुरस्काराने सन्मान

। पिंपरी चिंचवड ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सिंधुदुर्ग जिल्हा उत्कर्ष मंडळाचा ४७ वा वार्षिक कौटुंबिक स्नेहमेळावा स्वातंत्र्यदिनाच्या शुभमुहूर्तावर शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट रोजी ग. दी. माडगुळकर नाट्यगृह येथे मोठ्या उत्साहात पार पडला. हजारोच्या संख्येने सिंधुदुर्गवासियांनी हजेरी लावून हा सोहळा अविस्मरणीय ठरविला.**

या सोहळ्यात आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू मा. पांडुरंग साळगावकर यांच्या हस्ते तसेच मंडळाचे अध्यक्ष श्री. अजय संभाजी पाताडे यांच्या उपस्थितीत प्रा. बाळकृष्ण रामचंद्र लळीत यांना "सिंधुदुर्ग भूषण" या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थापकांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून औपचारिक उद्घाटन करण्यात आले. या स्नेहमेळाव्यादरम्यान भरतनाट्यम, कोळीगीते, देशभक्तीपर गीतांवर नृत्य, वेशभूषा स्पर्धा आदी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. मंडळातील सभासदांच्या कुटुंबियांनी सादर केलेल्या कलाविष्कारांनी उपस्थित प्रेक्षकांची मनं जिंकली. धनश्री मेंडजोगी व कोमल शिरभाते यांनी परीक्षक म्हणून भूमिका निभावली.




यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मंडळातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच कार्यक्रमाच्या अखेरीस लकी ड्रॉ काढून सभासदांना आकर्षक बक्षिसे प्रदान करण्यात आली.

स्नेहमेळाव्याच्या यशस्वितेसाठी उत्सव समितीचे अध्यक्ष पराग पालकर तसेच आनंद साटलकर, संजय सावंत, अनिल सावंत, नंदकिशोर सावंत, बाळकृष्ण गुरव, विश्वास राणे, महादेव बागवे, विजय अहिरे, संतोष गावडे, श्री कोरगावकर, विष्णू भुते, विजय महाडिक यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांमध्ये सुशील वारंग (जनरल मॅनेजर, स्किल डेव्हलपमेंट- कमर्शियल व्हेईकल, टाटा मोटर्स), राजू मिसाळ (माजी उपमहापौर), सुजाता पालांडे (नगरसेविका व भाजपा महिला अध्यक्षा), सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे, उद्योजक प्रमोद राणे, अरविंद पालव, रमेश बागवे, प्रकाश बापार्डेकर (अध्यक्ष, पांचाळमय ब्रम्ह सुतार), यशवंत कन्हेरे (पी. चि. मनपा स्वच्छता ब्रँड एम्बेसेडर), संदीप साळुंखे (अध्यक्ष, खेड युवा शक्ती फाउंडेशन), राहुल ढेबे, मयुरेश खानोलकर, शिवाजी चौगुले, अभय नरडवेकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष अजय पाताडे यांनी केले. तर सूत्रसंचालन संतोष साटम, संजय सावंत, भूमिका सावंत आणि क्षितिजा साटलकर यांनी रंगतदार पद्धतीने पार पाडले.

सिंधुदुर्ग जिल्हा उत्कर्ष मंडळाचा हा ४७ वा वार्षिक स्नेहमेळावा केवळ सांस्कृतिक संमेलन न ठरता, सिंधुदुर्गवासियांना एकत्र आणणारे, कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारे आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारे असे एक आगळेवेगळे व्यासपीठ ठरले

## व्ही. के. माटे हायस्कूलमध्ये देशभक्तीचा उत्साह!

### 79 वा स्वातंत्र्य दिन साजरा जल्लोषात; विद्यार्थ्यांचे बँड, समूहगान आणि कथाकथनाने मन जिंकले

। पिंपरी चिंचवड।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मोरया शिक्षण संस्थेच्या व्ही. के. माटे हायस्कूलमध्ये ७९ वा स्वातंत्र्य दिन अत्यंत उत्साहात, देशभक्तिपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष तथा विश्वस्त श्री. स्वप्निल शेडगे होते. प्रमुख पाहुणे म्हणून कुमारी प्रांजल जाधव व डॉ. राजेश्वर हेंद्रे उपस्थित होते.**



कार्यक्रमाची सुरुवात भारतमातेच्या पूजनाने झाली. यानंतर ध्वजारोहण करण्यात आले आणि विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी ध्वजाला सलामी दिली. राष्ट्रगीत, ध्वजगीत व राज्यगीतांचे सुमधुर गायन काव्या साताळकर, अनुष्का लोहार व शार्दुल देशिंगे यांनी पेटी व तबल्याच्या साथीने सादर केले. प्रतिज्ञावाचन श्री. हनुमंत हुचगोळ यांनी केले. शाळेच्या एमसीएफ, स्काऊट आणि गाईड पथकांनी संचलनाद्वारे उपस्थित मान्यवरांना मानवंदना दिली. संचलनाचं नेतृत्व तनिष्का भालेराव, माहेश्वरी फाटक, आयुष जाधव आणि अविष्कार बदर यांनी केले.

शाळेच्या प्राचार्या व कार्यवाह सौ. इंद्रायणी माटे पिसोळकर यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात देशप्रेम आणि देशभक्तीवर प्रभावी मार्गदर्शन केलं. त्यानंतर डॉ. राजेश्वर हेंद्रे लिखित "अव्यक्त भावपत्रे" या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. पालकांच्या मनातील भावनांना लेखनाच्या माध्यमातून मांडणाऱ्या या पुस्तकाची माहिती प्राचार्यांनी दिली.

#### देशभक्तीपर संस्कारांची साक्ष...

विविध स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पदक देऊन गौरविण्यात आले. स्काऊट मास्टर श्री. हनुमंत हुचगोळ, श्री. अनिल तिटकारे आणि गाईड कॅप्टन सौ. अनिता बोरसे यांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांमध्ये विशेष ऊर्जा निर्माण झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये संस्थेचे कार्यकारी सदस्य सौ. प्रतिभा कुलकर्णी, श्री. देव, खजिनदार श्री. रणजीत सावंत, उपमुख्याध्यापक श्री. दिलीप कुमावत, शिक्षक समन्वयक श्री. संजय खेडकर व पर्यवेक्षिका मैत्रेयी राजे यांचे योगदान मोलाचे होते. सूत्रसंचालन श्री. पंकज देव व श्री. हनुमंत हुचगोळ यांनी तर आभार प्रदर्शन सौ. मैत्रेयी राजे यांनी केले. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध, नेटका आणि उत्साहात पार पडत शाळेच्या देशभक्तीपर संस्कारांची साक्ष देत गेला.

## शाळेच्या आवारात देशभक्तीचा माहोल

# न्यू इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा!

## शिक्षण विश्व: विविध कला गुणदर्शनाच्या कार्यक्रमातून स्वातंत्र्याचे गौरव गान

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**न्यू इंग्लिश मिडियम स्कूल, थेरगाव येथे १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनाचा उत्सव अतिशय उत्साहात व गौरवशाली वातावरणात साजरा करण्यात आला. शाळेच्या आवारात देशभक्तीचा माहोल निर्माण झाला होता, आणि शिक्षक, विद्यार्थी, पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभाग घेतला..**



कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. संस्थेचे अध्यक्ष विजय पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष निलेश पलघुमल , सचिव अशोक मोरे, खजिनदार सुरेखा पवार, नयना माने , विलास शेलार, रमेश पाटील , विनायक पवार , संध्या पवार ,महादेव जमादार , शशिकांत इंगवले उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर शाळेतील ८वी आणि ९वीच्या विद्यार्थ्यांनी परेड सादर करत राष्ट्रीय ध्वजाला मानवंदना दिली. यानंतर शाळेच्या प्रायमरी, प्राथमिक व माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी नृत्य, भाषणं, समूहगीत, देशभक्तिपर गीतं अशा विविध कार्यक्रमांद्वारे आपले कलागुण सादर केले. विद्यार्थ्यांनी देशप्रेम आणि राष्ट्रभक्तीचे संदेश देणाऱ्या कार्यक्रमांमधून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमा दरम्यान राष्ट्रगीताचे सादरीकरण रूपाली माने व विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले.

# ‘मास्टर माईंड’मध्ये 79 वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा!

## शिक्षण विश्व: मास्टर माईंड स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये ‘मिशन सिंदूर’ थीमवर कार्यक्रम

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) शिष्यवृत्ती परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा (इयत्ता आठवी) अंतिम निकाल आणि शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीचा एकूण निकाल २२.०६ टक्के लागला आहे.**




मास्टर माईंड स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये स्वातंत्र्याचा महोत्सव अर्थात 79 वा स्वातंत्र्यदिन देशभक्तीच्या वातावरणात आणि सन्मानपूर्वक पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी आठ वाजता ध्वजारोहणाने झाली. शाळेच्या प्रांगणात आयोजित समारंभात प्रमुख पाहुणे मेजर जनरल जे. एन. नायर, शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. प्रदीपा नायर, तसेच प्रशासक मनीकंदन नायर यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. या वेळी सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून स्वातंत्र्यसंग्रामातील शूरवीरांच्या बलिदानाचे स्मरण करून दिले आणि आजच्या पिढीसमोर असलेल्या जबाबदाऱ्या, कर्तव्यांची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली. यानंतर शालेय गीताचे तसेच शाळेतील खेळाडूंना समर्पित जर्सी टी-शर्टचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या सांगतेस ‘वंदे मातरम’ या सामूहिक गीताने समारोप करण्यात आला. एकूणच, स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने मास्टर माईंड स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजने देशभक्ती, सामाजिक बांधिलकी आणि सांस्कृतिक समृद्धी यांचा सुंदर संगम साधला.

### सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर गीते, नृत्य आणि नाट्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावर्षी शाळेत “मिशन सिंदूर” या विशेष थीमवर आधारित कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्य, अभिनय व गायन कौशल्याचा बहारदार सादरीकरण केले. विविध स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

### देशभक्तीचा संदेश एरोमॉलमध्येही

कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी एरोमॉल येथे जाऊन “मिशन सिंदूर” वर आधारित मॉब डान्स देशभक्तीवर आधारित ऍक्ट व पथनाट्य सादर केले. यामुळे परिसरातील नागरिकांचेही लक्ष वेधून घेतले गेले आणि विद्यार्थ्यांमधील देशप्रेमाची भावना अधोरेखित झाली.

# गोपाळकाला आणि दहीहंडीच्या उत्सवात विद्यार्थी झाले चिंब!

## शिक्षण विश्व: थेरगाव येथील न्यू इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये भारतीय परंपरांचा गौरव

। पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**थेरगाव येथील न्यू इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये गोपाळकाला आणि दहीहंडी उत्सव पारंपरिक उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. शाळेमध्ये पारंपरिक व सांस्कृतिक मूल्यांना प्राधान्य देत विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम खास आयोजन करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनीही या कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.**

कार्यक्रमाची सुरुवात दहीहंडीच्या पूजनाने करण्यात आली. त्यानंतर शाळेच्या विविध वर्गातील विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत सुंदर सांस्कृतिक नृत्य सादर केली. बालचमूंनी आपल्या निरागस सादरीकरणाने उपस्थितांची मनं जिंकली, तर मोठ्या वर्गातील विद्यार्थ्यांनी केलेल्या सामूहिक नृत्यांनी कार्यक्रमात रंगत आणली

संस्थेचे अध्यक्ष विजय पवार, सचिव अशोक मोरे, उपाध्यक्ष निलेश पालघर, खजिनदार सुरेखा पवार, नैना माने , मुख्याध्यापिका विद्या नायगाव , शशिकांत इंगवले, विलास शेलार, रमेश पाटील, विनायक पवार, संध्या पवार, महादेव जमादार यांच्यासह इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.



दहीहंडी उत्सवाच्या मुख्य आकर्षणाचा भाग म्हणजे दहावीतील विद्यार्थ्यांनी लावलेले तीन मनोऱ्यांचे थर ठरले. विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मेहनतीचे आणि साहसाचे सर्वांनी कौतुक केले.

कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन क्रीडा शिक्षक यशवंत माने, विजय माने, रजनीकांत गोरे, वैभव हडप, आणि जयेश लखन यांनी केले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा पूर्ण विचार करत कार्यक्रमादरम्यान योग्य ती खबरदारी घेतली गेली.

# श्री दुर्गेश्वर चारिटेबल ट्रस्टची सामाजिक बांधिलकी!

## वर्षभर विविध विधायक उपक्रम : परिसरातील नागरिकांमध्ये जिव्हाळ्याचे नाते

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**निगडीतील प्राचीन आणि पवित्र श्री दुर्गेश्वर मंदिरातील स्वयंभू शिवलिंग आणि नंदी यांचे जिर्णोद्धार 1999 मध्ये होऊन मंदिराला नवी जीवनशक्ती प्राप्त झाली आहे. दररोज 4 ते 5 हजार भाविक श्रद्धाभावाने दर्शनासाठी येत असून, परिसरातील नागरिकांमध्ये दुर्गेश्वराच्या भक्तीचा एक जिव्हाळ्याचा स्नेह तयार झाला आहे.**







श्री दुर्गेश्वर चारिटेबल ट्रस्ट प्राधिकरणच्या नेतृत्वाखाली परिसरात वर्षभर विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन होत आहे. प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, दुर्गाष्ठमी, मकर संक्रांती, श्रावणी सोमवार, गणेशोत्सव, कोजागिरी पौर्णिमा, दिवाळी दीपोत्सव, भागवत सप्ताह तसेच रक्तदान शिबीर आणि जेष्ठ नागरिकांसाठी योगासन वर्ग अशा अनेक कार्यक्रमांनी स्थानिक समुदायाला एकत्र आणले आहे.

विशेष म्हणजे, प्रत्येक वर्षी जेष्ठ नागरिक विकास संघाकडून कीर्तन महोत्सवाचे आयोजन केले जाते. तसेच ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीत सहभागी होणारे वारकरी मंदिराला भेट देऊन धार्मिकतेची परंपरा जपत आहेत. ट्रस्टचे अध्यक्ष श्री गोविंद गायकवाड हे अध्यात्मिक मार्गदर्शक तसेच समाजसेवक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक एकात्मता आणि आध्यात्मिक विकास यांना प्रोत्साहन मिळाले असून, त्यांनी सदैव "सेवा हेच खरे धन आहे" हा संदेश दिला आहे.

ट्रस्टचे सचिव आनंदा साळुंखे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ट्रस्टच्या सदस्यांनी सतत प्रयत्न करून परिसरातील लोकांमध्ये एकजूट, धार्मिक जागरूकता आणि सामाजिक जबाबदारी वाढवली आहे. अध्यक्ष गोविंद गायकवाड, सचिव आनंदा साळुंखे, सहसचिव बाळासाहेब धुमाळ, खजिनदार विकास सोनवणे, उपाध्यक्ष अमित गावडे आणि कैलास जायगुडे यांचे कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. मंदिराचे प्रसिद्धी प्रमुख दिनेश लिंगावत यांनी वेळोवेळी मंदिराला निस्वार्थी भावाने मंदिराची सेवा करतात श्री दुर्गेश्वर चारिटेबल ट्रस्टच्या कार्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये श्रद्धा, सेवा आणि संस्कृतीची अमरता कायम राहिली असून सामाजिक बांधिलकी दृढ झाली आहे.



> "आध्यात्म म्हणजे अंतर्मुख होऊन आत्मशुद्धीचा प्रवास, तर समाजसेवा म्हणजे त्या शुद्ध आत्म्याने इतरांच्या जीवनात उजेड फुलवणे. जीवनातील खरी संपत्ती सेवा आणि श्रद्धेच्या मार्गावरच आहे.""
>
> **- आनंदा साळुंखे,** उपाध्यक्ष

# स्वातंत्र्य दिनाच्या उत्सवात दिसला देशभक्तीचा रंग!

## शिक्षण विश्व: कासारवाडी परिसरात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

। पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: देशभरात अभिमानाने आणि उत्साहाने साजरा होत असताना, कासारवाडी परिसरातील विविध शैक्षणिक आणि सामाजिक संस्थांमध्ये ध्वजारोहण समारंभाचे आयोजन करण्यात आले.**

यावेळी सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा जवळकर यांनी उर्दू स्कूल, सिद्धी विनायक मंदिर, डी एम के इंटरनॅशनल स्कूल, विकास शील सोसायटी, तसेच ज्येष्ठ नागरिक संघ, कासारवाडी येथे ध्वजारोहण समारंभाला उपस्थित राहून तिरंग्याला अभिमानाने वंदन केले.

या वेळी विद्यार्थी, शिक्षक, नागरिक आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प्रत्येक ठिकाणी राष्ट्रगीताचे सामूहिक गायन, देशभक्तिपर गीतांची गाणी आणि विद्यार्थ्यांच्या जोशपूर्ण भाषणांनी वातावरण भारावून गेले होते. यावेळी देशासाठी बलिदान देणाऱ्या वीरांना आदरांजली वाहून त्यांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले.

"स्वातंत्र्याचा खरा अर्थ समजून घेणे आणि देशासाठी जबाबदार नागरिक म्हणून योगदान देणे ही आपल्या सर्वांची नैतिक जबाबदारी आहे. आजचा दिवस देशभक्तीच्या रंगांनी आणि आनंदाच्या उत्साहाने भारलेला आहे.
**-प्रतिभा जवळकर,** सामाजिक कार्यकर्त्या

